# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/ ३७५, ३७८, ३८२, ३८७,३८८,३९१, ३९५,३९७,३९८,४०३ –२०१०–११/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. दत्ता यल्लाप्पा कोळी ( केस क्र.३७५/२०१०–११)<br>मु.पो. निगडी खुर्द, जत, जि. सांगली<br>२) श्री. मल्लीनाथ विरुपाक्ष जत्ती, (केस क्र.३७८/२०१०–११)<br>मु.पो. करेवाडी, ता. जत, जि. सांगली<br>३) श्री. रामा भिवा डोंबाळे, (केस क्र.३८२/२०१०–११)<br>मु.पो. लकडेवाडी, ता. जत, जि. सांगली<br>४) श्री. संगाप्पा चनबसु केसगोंड, ( केस क्र. ३८७/२०१०–११)<br>मु.पो. उटगी, ता. जत, जि. सांगली<br>५) श्री. बबन तातोबा बंडगर, ( केस क्र. ३८८/२०१०–११)<br>मु.पो. रेवनाळ, ता. जत, जि. सांगली<br>६) श्री. शंकरेप्पा शेट्याप्पा माळी ( केस क्र. ३९१/२०१०–११)<br>मु.पो. माडग्याळ, ता. जत, जि. सांगली<br>७) ईलाही मकबूल मंगळवेढे , ( केस क्र. ३९५/२०१०–११)<br>मु.पो. बिलूर, ता. जत, जि. सांगली<br>८) शंकर रामू देवर्षी ( केस क्र. ३९७/२०१०–११)<br>मु.पो. मुचंडी, ता. जत, जि. सांगली<br>९) श्रीमती महादेवी बंडू कोळी , ( केस क्र. ३९८/२०१०–११)<br>मु.पो. मेंडेगिरी, ता. जत, जि. सांगली<br>१०) श्री. हरिबा श्रीपती धायगुडे , ( केस क्र. ४०३/२०१०–११)<br>मु.पो. कुणीकोणूर, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि., मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, वि.का. क. महांकाळ, जि.सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, उप विभाग, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

# महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

या दहाही तक्रारीं अनुक्रमे ३७५/१०–११, ३७८/१०–११, ३८२/१०–११, ३८७/१०–११, ३८८/१०–११, ३९१/१०–११ व ३९५/१०–११, ३९७/१०–११, ३९८/१०–११, ४०३/२०१०–११ यामध्ये तक्रारदाराची मागणी एकच आहे व कायद्याचा मुद्दा एकच आहे म्हणून तक्रारदारांचे प्रतिनिधी व वि.प.च्या अधिकाऱ्यांच्या संमत्तीने एकत्रित निर्णय करण्यात येत आहे. या दहाही तक्रारी प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केलेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

केस क्र. ३७५/२०१०–११

श्री. दत्ता यल्लाप्पा कोळी, मु.पो. निगडी खुर्द, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. ११.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने आपल्या गट क्र. ७०० मध्ये ५ अश्वशक्ती शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ५,०००/– पावती क्र. ५३४६८३२ दि. १६.८.२०१० रोजी भरले. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्या आदेशानुसार चाचणी अहवाल दि. २८.९.२०१० रोजी दिला आहे. वि.प.ने कृती मानके विनियमांतर्गत विहीत मुदतीत वीज पुरवठा केलेला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत – विद्युत पुरवठा मिळावा व तो देण्याबाबत झालेल्या विलंबापोटी कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ४.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. २८.९.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.०६ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. परंतु दि. ६.१०.२०१० रोजी ग्राहकाचे जागेची तपासणी केली असता जागेवर संच मांडणी आढळून आली नाही. वरिष्ठ कार्यालयाच्या सुचनेनुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे. सदर काम पूर्ण होताच प्रस्तुत ग्राहकास लघुदाब वाहिनी उभी करुन नियमानुसार कनेक्शन देत आहोत. तरी ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

अशाच प्रकारचा बचाव उर्वरित सर्व तक्रारींमध्ये घेतला आहे. प्रामुख्याने या सर्व तक्रारींमध्ये चलन भरल्याची तारीख ३१.३.२०१० नंतरची आहे.

केस क्र. ३७८/२०१०–११

श्री. मल्लीनाथ विरुपाक्ष जत्ती, मु.पो. करेवाडी, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. ११.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने आपल्या गट क्र. १६३ मध्ये ५ अश्वशक्ती शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु.५,०००/– पावती क्र. ५३४५२८३ दि. १६.७.२०१० रोजी भरले. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्या आदेशानुसार चाचणी अहवाल दि. ३०.९.२०१० रोजी दिला आहे. वि.प.ने कृती मानके विनियमांतर्गत विहीत मुदतीत वीज पुरवठा केलेला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत – विद्युत पुरवठा मिळावा व तो देण्याबाबत झालेल्या विलंबापोटी कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ४.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. ३०.९.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.५४ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. परंतु दि. ५.१०.२०१० रोजी ग्राहकाचे जागेची तपासणी केली असता जागेवर संच मांडणी आढळून आली नाही. ग्राहकास लघुदाब वाहिनी उभी करुन नियमानुसार कनेक्शन देत आहोत. तरी ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

<u>केस क्र. ३८२/२०१०–११</u>

श्री. रामा भिवा डोंबाळे, मु.पो. लकडेवाडी, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २०.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने आपल्या गट क्र. २६२ मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ४,०००/– पावती क्र. ५३४४०४० दि. १९.६.२०१० रोजी भरले. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे दि. २२.६.२०१० ला तक्रार दिली. त्यामध्ये दि. ४.८.२०१० ला अंतर्गत कक्षाचे आदेश झाले. त्यामध्ये विनियमातील विहीत कालावधीत वीज पुरवठा द्यावा अथवा नियमाप्रमाणे भरपाई देणेत यावी असे आदेश दिले आहेत. ग्राहकाने संख उप विभागाकडे दि. ८.९.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला. ग्राहकाने कक्षाचा आदेश मान्य परंतु कृती मानकांची अंमलबजावणी होत नाही म्हणून तक्रार दाखल करीत आहे असे म्हटले आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ४.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. ८.९.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.७८ कि.मी.चे लघुदाब वाहिनी व ०.४२ कि.मी. उच्चदाब वाहिनीचे काम आहे. सदर काम पूर्ण होताच ग्राहकास नियमानुसार कनेक्शन देत आहोत. तरी ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

<u>केस क्र. ३८७/२०१०–११</u>

श्री. संगाप्पा चनबसु केसगोंड, मु.पो. उटगी, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २०.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने आपल्या गट क्र. ३३२/१ मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ४,०००/– पावती क्र. ५३४२४७० दि. १३.४.२०१० रोजी भरले. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे दि. १४.६.२०१० ला तक्रार दिली. त्यामध्ये दि. ४.८.२०१० ला अंतर्गत कक्षाचे आदेश झाले. त्यामध्ये विनियमातील विहीत कालावधीत वीज पुरवठा द्यावा अथवा नियमाप्रमाणे भरपाई देणेत यावी असे आदेश दिले आहेत. ग्राहकाने सावळज उप विभागाकडे दि. १३.४.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला. ग्राहकाने कक्षाचा आदेश मान्य परंतु कृती मानकांची अंमलबजावणी होत नाही म्हणून तक्रार दाखल करीत आहे असे म्हटले आहे. मंचाकडून अपेक्षित मदत – वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ४.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. १६.४.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.१२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. ग्राहकास लघुदाब वाहिनी उभी करुन नियमानुसार कनेक्शन देत आहोत. तरी ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

केस क्र. ३८८/२०१०–११

श्री. बबन तातोबा बंडगर, मु.पो. रेवनाळ, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २०.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने आपल्या शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ५,०००/– पावती क्र. ०४७६३८४ दि. ६.५.२०१० रोजी भरले. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे दि. ११.८.२०१० ला तक्रार दिली. त्यामध्ये दि. २१.९.२०१० ला अंतर्गत कक्षाचे आदेश झाले. त्यामध्ये विनियमातील विहीत कालावधीत वीज पुरवठा द्यावा अथवा नियमाप्रमाणे भरपाई देणेत यावी असे आदेश दिले आहेत. ग्राहकाने संच मांडणी करुन जत उप विभागाकडे दि. १.१०.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला. आजतागयात वीज जोडणी दिली नाही. मंचाकडून अपेक्षित मदत – वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ४.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. १.१०.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.०६ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या सुचनेनुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या व चाचणी अहवाल दिलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. अशा ग्राहकांची संख्या ८०५ आहे. ह्या सर्व ग्राहकांची कामे झाले नंतर श्री. बबन तातोबा बंडगर,रा. रेवनाळ यांचे काम जेष्ठतायादीनुसार हाती घेवून पूर्ण करण्यात येईल. तरी ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

केस क्र. ३९१/२०१०–११

श्री. शंकरेप्पा शेट्याप्पा माळी, मु.पो. माडग्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २४.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने गट क्र. १३४ मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ४,०००/– पावती क्र. ५३४३५८८ दि. १९.५.२०१० रोजी भरले. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे दि. २२.६.२०१० ला तक्रार दिली. त्यामध्ये दि. ४.८.२०१० ला अंतर्गत कक्षाचे आदेश झाले. त्यामध्ये विनियमातील विहीत कालावधीत वीज पुरवठा द्यावा अथवा नियमाप्रमाणे भरपाई देणेत यावी असे आदेश दिले आहेत. ग्राहकाने दि. २३.९.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला. आजतागयात वीज जोडणी दिली नाही. ग्राहकाने कक्षाचा आदेश मान्य परंतु कृ ती मानकांची अंमलबजावणी होत नाही म्हणून तक्रार दाखल करीत आहे असे म्हटले आहे. मंचाकडून अपेक्षित मदत – वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ४.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. २५.९.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.०६ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. ग्राहकास लघुदाब वाहिनी उभी करुन नियमानुसार कनेक्शन देत आहोत. तरी ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

केस क्र. ३९५/२०१०–११

श्री. ईलाही मकबूल मंगळवेढे, मु.पो. बिलूर, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २४.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने गट क्र. २३२ मध्ये ५ अश्वशक्ती शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ५,०००/– पावती क्र. ८०२८०४२ दि. १४.७.२०१० रोजी भरले.

ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे दि. २४.८.२०१० ला तक्रार दिली. त्यामध्ये दि. २१.९.२०१० ला अंतर्गत कक्षाचे आदेश झाले. त्यामध्ये विनियमातील विहीत कालावधीत वीज पुरवठा द्यावा अथवा नियमाप्रमाणे भरपाई देणेत यावी असे आदेश दिले आहेत. ग्राहकाने दि. १८.१०.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला. आजतागयात वीज जोडणी दिली नाही. ग्राहकाने कक्षाचा आदेश मान्य परंतु कृती मानकांची अंमलबजावणी होत नाही म्हणून तक्रार दाखल करीत आहे असे म्हटले आहे. मंचाकडून अपेक्षित मदत – वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ४.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. १८.१०.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे, ०.५४ कि.मी. उच्चदाब वाहिनीचे व ६३ केव्हीए एका रोहित्राचे काम आहे. सध्या कंपनीच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या व चाचणी अहवाल दिलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. अशा ग्राहकांची संख्या ८०५ आहे. ह्या सर्व ग्राहकांची कामे झाले नंतर श्री. ईलाही मकबूल मंगळवेढे, रा. बिलूर यांचे काम जेष्ठतायादीनुसार हाती घेवून पूर्ण करण्यात येईल. तरी ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

<u>केस क्र. ३९७/२०१०–११</u>

श्री. शंकर रामू देवर्षी, मु.पो. मुचंडी, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २४.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने गट क्र. १७७/१ मध्ये ५ अश्वशक्ती शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु.२५००/– + रु.२५००/– = रु. ५,०००/– पावती क्र. ५३४२५८१ दि. १९.४.२०१० नुसार भरले. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे दि. ११.११.२०१० ला तक्रार दिली. अंतर्गत कक्षाने आजतागयात आदेश झाले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत – वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ४.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. १९.४.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. या ग्राहकाचे काम जेष्ठतायादीनुसार हाती घेवून पूर्ण करण्यात येईल. तरी ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

<u>केस क्र. ३९८/२०१०–११</u>

श्रीमती महादेवी बंडू कोळी. मु.पो. मेंडेगिरी, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २४.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने गट क्र. १२५/१ मध्ये ५ अश्वशक्ती शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु.२५००/– + रु.२५००/– = रु. ५,०००/– पावती क्र. ४७६२४३ दि. ३.५.२०१० नुसार भरले. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे दि. ११.११.२०१० ला तक्रार दिली. त्यामध्ये आदेश झाले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत – वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ४.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. २३.७.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.३ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. सध्या कंपनीच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या व चाचणी अहवाल दिलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. अशा ग्राहकांची संख्या ८०५ आहे. ह्या सर्व ग्राहकांची कामे झाले नंतर श्रीमती महादेवी बंडू कोळी. रा. मेंडेगिरी यांचे काम जेष्ठतायादीनुसार हाती घेवून पूर्ण करण्यात येईल. तरी ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

<u>केस क्र. ४०३/२०१०-११</u>

श्री. हरिबा श्रीपती धायगुडे, मु.पो. कुणीकोणूर, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २४.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने गट क्र. ४६० मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ४,०००/- पावती क्र. ५३४६०५९ दि. ३.८.२०१० रोजी भरले. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे दि. ७.८.२०१० ला तक्रार दिली. त्यामध्ये दि. २१.९.२०१० ला अंतर्गत कक्षाचे आदेश झाले. त्यामध्ये विनियमातील विहीत कालावधीत वीज पुरवठा द्यावा अथवा नियमाप्रमाणे भरपाई देणेत यावी असे आदेश दिले आहेत. ग्राहकाने दि. ११.१०.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला. आजतागयात वीज जोडणी दिली नाही. ग्राहकाने कक्षाचा आदेश मान्य परंतु कृ ती मानकांची अंमलबजावणी होत नाही म्हणून तक्रार दाखल करीत आहे असे म्हटले आहे. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ४.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. १०.१०.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.३६ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. सध्या कंपनीच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या व चाचणी अहवाल दिलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. अशा ग्राहकांची संख्या ८०५ आहे. ह्या सर्व ग्राहकांची कामे झाले नंतर श्री. हरिबा श्रीपती धायगुडे, रा. कुणीकोणूर यांचे काम जेष्ठतायादीनुसार हाती घेवून पूर्ण करण्यात येईल. तरी ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

या सर्व तक्रारींची सुनावणी मंचासमोर दि. ७.३.२०११ ला घेतली असतां, ग्राहक प्रतिनिधी श्री.खापरे उपस्थित. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, श्री. टिळक, सहाय्यक अभियंता व श्री.कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. श्री. खापरे यांनी ग्राहकांनी विद्युत पुरवठा मागणी अर्ज करुन वि.प.ने दिलेल्या चलनाप्रमाणे रक्कम भरली आहे, प्रत्येक केसमध्ये चाचणी अहवाल दिलेला आहे. अंतर्गत कक्षाचा आदेश होवूनही वीज जोडणी दिली नाही. कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत कालावधीत वीज जोडणी दिली नाही, त्यामुळे झालेल्या विलंबापोटी भरपाई व वीज जोडणी मिळावी अशी मागणी केली आहे.

या उलट, श्री. टिळक यांनी वरिष्ठ कार्यालयाचे आदेशानुसार दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांना दि. ३१.३.२०११ पर्यंत वीज जोडणी दिल्यानंतर या सर्व ग्राहकांना वीज जोडणी देण्याचा प्रयत्न करीत आहोत असे मंचासमोर तोंडी प्रतिपादन केले. त्याच्या पुष्ट्यर्थ कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांचे मंचाला अग्रेषित केलेले दि. ५.३.२०११ चे पत्र दाखल केले.

वरील विवेचानावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) या सर्व ग्राहकांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी व विलंबापोटी भरपाई देण्याचे आदेश वि.प.स देणे योग्य व कायदेशीर होईल काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

## कारणमिमांसा

या दहा तक्रारीतील तक्रारदार हे जरी वेगवेगळ्या उप विभागातील असले तरी कवठे महांकाळ विभागाच्या अंतर्गतच येत आहेत. वि.प.ने ग्राहकांचे अर्ज व त्यांना दिलेले चलन भरले असून ग्राहकांनी चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले आहे. कांही तक्रारींत जागेची तपासणी केली असतां संच मांडणी आढळूनआली नाही असा बचाव वि.प.ने घेतला आहे तो निरर्थक आहे असे मंचाचे मत आहे, कारण अशी तपासणी केल्याचा अहवाल मंचासमोर हजर केलेला नाही, ग्राहकास नोटीस दिल्याचा पुरावा हजर केलेला नाही, या उलट, चाचणी अहवाल खोटा असल्याबद्दल संबंधित कंत्राटदारावर कारवाई केलेली नाही. ग्राहकाच्या जागेची तपासणी केली असतां, संच मांडणी आढळून आली नाही हे कारण बचावासाठी घेतलेचे दिसते, त्यामध्ये खरेपणा दिसत नाही.

या सर्व तक्रारीत आपल्या लेखी अहवालात वि.प.ने वरिष्ठ कार्यालयाचे सूचनेनुसार दि.३१.३.२०१० पर्यंत चलन भरलेल्या ग्राहकांना वीज जोडणी दि. ३१.३.२०११ पर्यंत देण्याचे आदेश आहेत असे म्हटले आहे. प्रथमत: वि.प.च्या वरिष्ठ कार्यालयाचे परिपत्रक हे मा. आयोगाने मंजूर केलेल्या अधिनियमावर मात करु शकत नाही. विद्युत कायदा २००३ कलम ४३ नुसार ग्राहकाचा अर्ज पूर्ण झाल्यावर त्यांस वीज जोडणी देणे हे वि.प.वर बंधनकारक आहे. मा.आयोगाचे अशा अधिनियमांना मंजुरी देवून ठराविक मुदतीत ग्राहकांना वीज जोडणी देण्याचे आदेश आहेत. कृती मानके विनियमातील तरतुदीची पूर्तता करण्यात वि.प.ला अपयश आल्यास प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे भरपाई देणे वि.प.वर बंधनकारक आहे. त्यामुळे केवळ दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांना दि. ३१.३.२०११ पर्यंत वीज जोडणी देवून इतरांना कायद्याने प्राप्त झालेला वीज जोडणी मागण्याचा अधिकार / हक्क वि.प.स नाकारता येणार नाही असे येथे नमूद करावेसे वाटते. वि.प.च्या वरिष्ठ कार्यालयाचे परिपत्रकामध्ये केवळ दि. ३१.३.२०१० पर्यतची प्रलंबित केसेस बरोबरच इतर ग्राहकांचीही कनेक्शन्स करावीत असे संकेत दिले आहेत, करु नये असे स्पष्ट आदेश नाहीत. त्यामुळे वि.प.चे ३१.३.२०१० पूर्वीची प्रलंबित कामे झाल्याशिवाय इतर कामे हाती घेवू शकत नाही व वीज जोडणी देवू शकत नाही हे म्हणणे कायद्याने जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न आहे. असे असले तरी, असे परिपत्रक काढतांना मा. आयोगाच्या कृती मानकांचा अंतर्भाव अशा परिपत्रकात वि.प.स टाळता येणार नाही. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– भरपाई वि.प.ने द्यावी असे मा. आयोगाच्या अधिनियमात आदेश दिलेले आहेत. त्यामुळे वरिष्ठ कार्यालयाचे परिपत्रक किंवा सूचना या सबबीवर विलंबापोटी भरपाई देण्याची जबाबदारी टाळता येणार नाही, तसेच ग्राहकाची वीज जोडणी लांबणीवर टाकता येणार नाही.

या सर्व ग्राहकाचं लघुदाब वाहिनीचे काम आहे असे दिसते. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात तांत्रिकदृष्ट्या ग्राहकांकडून कुठल्याही प्रकारची कमतरता / त्रुटी आहेत असे दाखवून दिले नाही. ग्राहकांकडून चलन भरल्यानंतर त्यांस वीज जोडणी देण्याची जबाबदारी वि.प.वर येते. ती जबाबदारी पूर्ण न केल्यास भरपाईची जबाबदारी येते. त्यामुळे या दहाही ग्राहकांची वीज जोडणी मागणी मंजूर करण्यात येत आहे व कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ३ महिन्यांचा काळ वगळता त्या नंतरच्या कालावधीपासून प्रत्यक्ष वीज जोडणी होईपर्यंत प्रति आठवडा रु. १००/– भरपाई मिळण्याचा ग्राहकांचा हक्क आहे व वि.प.ची भरपाई देण्याची कायदेशीर जबाबदारी आहे.

विनियम २००६ मधील ८.२ च्या तरतुदीनुसार हे मंच ग्राहकाच्या तक्रारीचे निवारण ठराविक कालावधीत ( Time bound manner ) करण्याचे आदेश देवू शकते. त्यामुळे वि.प.चे म्हणणे युध्दपातळीवर ८०५ ग्राहकांचे वीज जोडणीचे काम चालू आहे हे लक्षांत घेता या दहाही तक्रारदार ग्राहकांस दि. ३०.६.२०११ पर्यंत वीज जोडणी देण्याचे आदेश देणेत येत आहेत. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) या सर्व तक्रारी ३७५/१०–११, ३७८/१०–११, ३८२/१०–११, ३८७/१०–११, ३८८/१०–११, ३९१/१०–११ व ३९५/१०–११, ३९७/१०–११, ३९८/१०–११, ४०३/२०१०–११ मंजूर करण्यात येत आहेत.

२) वितरण कंपनी कवठे महांकाळ विभाग व संबंधित उप विभाग यांनी या तक्रारीतील प्रत्येक ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे दि. ३०.६.२०११ पर्यंत विद्युत पुरवठा द्यावा व कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे ग्राहकाने चलन भरलेल्या तारखेपासून ३ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर प्रत्यक्ष वीज जोडणी देईपर्यंतच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे ग्राहकास भरपाई द्यावी. सदर भरपाइच्या रकमेचे समायोजन ग्राहकास वीज जोडणी दिल्यानंतर दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम रोखीने द्यावी.

३) या आदेशाची एक प्रत सर्व तक्रारींमध्ये ठेवण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५)  या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

अंतर्गत क वि.प.ने कृती मानके विनियमांतर्गत विहीत मुदतीत वीज पुरवठा केलेला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत – विद्युत पुरवठा मिळावा व तो देण्याबाबत झालेल्या विलंबापोटी कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

परंतु ग्राहकास चाचणी अहवाल खोटा असल्याचे ५.१.२०११ ला पत्राने कळविले आहे. अशी तपासणी १ वर्षानंतर केलेली आहे. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. दि. १३.५.२०१० ला तक्रार दाखल केली त्यामध्ये दि. ३०.६.२०१० ला आदेश झाले. अंतर्गत कक्षाने कृती मानके विनियमानुसारच्या कालावधीत का करुन नमूद असलेल्या कालावधीत वीज पुरवठा करण्यात यावा अन्यथा विलंबापोटी नियमाप्रमाणे भरपाई देणेत यावी असे आदेश दिले. ग्राहकाने वीज पुरवठा मिळावा व तो देण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी. हा दावा कृती मानके पूर्ण झालेच्या आंत दोन महिन्यात करता येतो, त्यामुळे मागणीस विलंब नाही असे गाऱ्हाण्यात कथन केले.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. ५.१.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. त्यांचे ०.५४ कि.मी. लघुदाब वाहिनी काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये वर्षवार जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे, त्यामुळे ग्राहकाचे कनेक्शन ३१.३.२०११ पूर्वी देण्याची व्यवस्था करीत आहोत, त्यामुळे ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

<u>केस क्र. ३८०–२०१०–११</u>

श्री. विश्वनाथ सुबराव जगताप, मु.पो. कोत्येन बोबलाद, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २०.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले.

विश्वनाथ सुबराव जगताप यांनी आपले शेत जमीन गट क्र. २३१ मध्ये ३ अश्वशक्ती वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ४०००/– पावती क्र. ५३३९४१४ दि. २२.२.२०१० रोजी भरले. त्यानंतर ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ४.३.२०१० ला तक्रार दाखल केली त्यामध्ये दि. ३.५.२०१० ला आदेश झाले. ग्राहकाने आपल्या तक्रारीत संघटनेने मा. विद्युत नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या केस क्र. १५/२००७ चा संदर्भ देवून दि. ४.७.२००७ ची सुनावणी व मा.आयोगाच्या निरीक्षणाचा उल्लेख केला आहे. कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांनी जागेवर संच मांडणी नसल्याचे कळविले आहे. परंतु लघुदाब वाहिनीचे काम करुन विनियमातील विहीत कालावधीत विद्युत पुरवठा द्यावा अथवा नियमाप्रमाणे भरपाई द्यावी असे अंतर्गत कक्षाने आदेशात म्हटले आहे. ग्राहकाने संख उप विभागाकडे दि. २०.७.२०१० ला चाचणी अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे अर्ज दिल्याच्या तारखेपासून ती महिन्यात वीज जोडणी मिळाली नसल्याने वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे मान्य केले आहे. ग्राहकाचे ०.२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये वर्षवार जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे, त्यामुळे ग्राहकाचे कनेक्शन ३१.३.२०११ पूर्वी देण्याची व्यवस्था करीत आहोत, त्यामुळे ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

<u>केस क्र. ३८१ –२०१०–११</u>

जगन्नाथ सुबराव जगताप सुबराव जगताप, मु.पो. कोत्येन बोबलाद, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २०.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले.

ग्राहकाने आपली शेत जमीन गट क्र. २३१ मध्ये ५ अश्वशक्ती वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ५०००/– पावती क्र. ५३३९४१५ दि. २२.२.२०१० रोजी भरले. त्यानंतर ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ४.३.२०१० ला तक्रार दाखल केली त्यामध्ये दि. ३.५.२०१० ला आदेश झाले. ग्राहकाने आपल्या तक्रारीत संघटनेने मा. विद्युत नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या केस क्र. १५/२००७ चा संदर्भ देवून दि. ४.७.२००७ ची सुनावणी व मा.आयोगाच्या निरीक्षणाचा उल्लेख केला आहे. ग्राहकाने संख उप विभागाकडे दि. २०.७.२०१० ला चाचणी अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे अर्ज दिल्याच्या तारखेपासून ती महिन्यात वीज जोडणी मिळाली नसल्याने वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. २०.७.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.१२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये वर्षवार जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे, त्यामुळे ग्राहकाचे कनेक्शन ३१.३.२०११ पूर्वी देण्याची व्यवस्था करीत आहोत, त्यामुळे ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

<u>केस क्र. ३९९ –२०१०–११</u>

सौं. उज्वला रंगराव सावंत, मु.पो. कोत्येन बोबलाद, ता. जत, जि. सांगली यांनी वि.प.कडे आपली शेत जमीन गट क्र. ४४३ येथे शेतीपंपास ५ अश्वशक्ती वीज पुरवठा मिळावा यासाठी रु. २५००/– +२५००/– = रु. ५०००/– पावती क्र. ५३४००८९ दि. ८.३.२०१० नुसार भरले आहेत. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र.६७० दि. ११.११.२०१० ला दाखल केली. त्यामध्ये कक्षाने आदेश केले नाहीत, म्हणून मंचाकडे प्रतिनिधीमार्फत दि. २४.१.२०११ ला तक्रार दाखल केली. त्यामध्ये वीज जोडणी मिळावी व झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली. ग्राहकाने आपल्या तक्रारीत कृती मानके विनियम २००५ चे कलम ४.५ वर भर दिला आहे, त्याचप्रमाणे विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ मधील कलम ६ चा उल्लेख केला आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. २७.४.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या व चाचणी अहवाल दिलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये वर्षवार जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे, त्यामुळे ग्राहकाचे कनेक्शनचे काम जेष्ठतायादीनुसार हाती घेवून पूर्ण करण्यात येईल, त्यामुळे ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

<u>केस क्र. ४०० –२०१०–११</u>

श्री. बनाप्पा संभा निळे, मु.पो. लकडेवाडी, ता. जत, जि. सांगली यांनी वि.प.कडे आपली शेत जमीन गट क्र. ४४३ येथे शेतीपंपास ५ अश्वशक्ती वीज पुरवठा मिळावा यासाठी रु. २५००/– +११००/– +१००/– = रु. ३७००/– पावती क्र. ४१३१५ दि. १६.१०.२००६ नुसार भरले

आहेत. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ५७८ दि. १.१०.२०१० ला दाखल केली. त्यामध्ये कक्षाने आदेश केले नाहीत, म्हणून मंचाकडे प्रतिनिधीमार्फत दि. २४.१.२०११ ला तक्रार दाखल केली. त्यामध्ये वीज जोडणी मिळावी व झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली. ग्राहकाने आपल्या तक्रारीत कृती मानके विनियम २००५ चे कलम ४.५ वर भर दिला आहे, त्याचप्रमाणे विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ मधील कलम ६ चा उल्लेख केला आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. ५.५.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.३० कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या व चाचणी अहवाल दिलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये वर्षवार जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे, त्यामुळे ग्राहकाचे कनेक्शनचे काम जेष्ठतायादीनुसार हाती घेवून पूर्ण करण्यात येईल, त्यामुळे ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

या पाचही तक्रारींची सुनावणी मंचासमोर दि. ७.३.२०११ ला घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, श्री. टिळक, सहाय्यक अभियंता व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी यांनी वि.प. कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयशी ठरली आहे. ग्राहकांनी चलन भरुन चाचणी अहवाल दिल्यानंतरही मुदतीत वीज जोडणी दिलेली नाही. त्यामुळे विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मागणी केली. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. ३१.३.२०११ पर्यंत वीज जोडणी देत आहे असे मंचासमोर सांगितले. तथापि, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांचे दि. ५.३.२०११ चे मंचाला अग्रेषित केलेले पत्र मंचामध्ये दाखल केले. त्यामध्ये एकूण १६ केसेस पैंकी या ५ केसेसमध्ये यापूर्वी लेखी अहवालात दिलेला मजकूर बदल करुन दि. ३१.३.२०११ पर्यत वीज जोडणी देण्याचा प्रयत्न करीत आहोत असे म्हणणे दाखल केले आहे.

वरीलविवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) या पाचही तक्रारीमध्ये ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी देणेचे वि.प.स आदेश देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

## कारणमिमांसा

या पाचही तक्रारी सुनावणीस घेतल्या असतां, वि.प.च्या अधिकाऱ्यांनी या सर्व तक्रारीमध्ये चलन दि. ३१.३.२०१० पूर्वी भरल्याचे मान्य केले आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांना वरिष्ठ कार्यालयाचे आदेशास अनुसरुन या सर्व केसेसमध्ये दि. ३१.३.२०११ पर्यंत वीज कनेक्शन्स देत आहोत असे सांगितले. या पाचही तक्रारीमध्ये वि.प.ने लेखी अहवालात म्हणणे दाखल केले आहे, परंतु सुनावणीचेवेळी कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांच्या सहीने दाखल दि. ५.३.२०११ च्या पत्रात ‘ प्रयत्न करीत आहोत ‘ अशाप्रकारची दुरुस्ती केल्याचे दिसते. या ठिकाणी वि.प.चे अधिकारी श्री. कांबळे हे आपल्या वरिष्ठ कार्यालयाचे परिपत्रकाविरुध्द भूमिका मंचासमोर मांडत आहेत याचे आश्चर्य वाटते. खरेतर वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे असे म्हटल्यानंतर ‘ प्रयत्न करीत आहोत ‘ असे पत्राद्वारे मंचासमोर

उपस्थित न राहता लेखी पत्र देणे निश्चितपणे कार्यकारी अभियंता श्री. कांबळे यांच्याकडून अपेक्षित नाही. असा वेगळा बचाव ते घेवू शकत नाहीत आणि जरी घेतला तरी नंतरचा बचाव ‘ प्रयत्न करीत आहोत ‘ हा विचारांत घेता योणार नाही आणि त्याकडे फारसे गांभीर्याने पाहता येणार नाही. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार मंचाला आदेश करीत असतांना ठराविक काळात (Time bound programme ) ग्राहकाचे गाऱ्हाणे दूर करण्याचे आदेश देता येतात. वि.प.ने दि. ३१.३.२०११ पर्यंत वीज जोडणी देतो असे म्हणणे दाखल केल्यावर त्यानंतर ‘ प्रयत्न करीत आहोत ‘ असे After throught म्हणणे सादर करणेत येत आहे.

या सर्व ग्राहकांच्या वीज जोडणी करिता इतर कांही तांत्रिक बाबींची पूर्तता करावयाची नाही हे वि.प.च्या लेखी अहवालावरुन स्पष्ट होते. त्यामुळे ३ महिन्याचे मुदतीनंतर वीज जोडणी न दिल्याने मंचाला या ग्राहकांना वीज जोडणी देण्याचे आदेश देणे संयुक्तिक व कायदेशीर ठरते. विद्युत कायदा २००३ कलम ४३ नुसार वि.प.ने ग्राहकांनी मागणी केल्याप्रमाणे विद्युत पुरवठा करणे त्यांचेवर बंधनकारक आहे, ती त्यांची जबाबदारी आहे आणि मंचाने ठराविक मुदतीत अशी वीज जोडणी द्यावी असे आदेश मंच करु शकते. परंतु वि.प.च्या अधिकाऱ्यांचे प्रामाणिक प्रयत्न दि. ३१.३.२०११ पर्यत वीज जोडणी देण्यासाठी विचारांत घेवून त्यांना १० दिवसांचा grace period देणे जरुरी वाटते.

या सर्व ग्राहकांना वीज जोडणी दि. ३१.३.२०११ पर्यंत देण्यात येत आहे. यात कसूर झाल्यास ग्राहक प्रतिनिधी मा. आयोगाकडे विद्युत कायदा २००३ कलम १४२ नुसार वि.प.विरुध्द कारवाई करण्यासाठी दादा मागू शकतात.

या ठिकाणी ग्राहक प्रतिनिधी यांनी वि.प. कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयशी ठरली आहे. ग्राहकांना मुदतीत वीज जोडणी न दिल्याने विलंबापोटी भरपाईची मागणी तक्रारीत केलेली आहे. त्यामुळे विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– भरपाई मिळण्याचा ग्राहकाचा हक्क आहे. खालील प्रमाणे आदेश –

## **आदेश**

१) तक्रार क्र. ३७३, ३८०, ३८१, ३९९, ४००/२०१०–११ मंजूर करण्यात येत आहेत.

२) वितरण कंपनी कवठे महांकाळ अंतर्गत संबंधित उप विभागाने या पाचही ग्राहकांना त्यांच्या अर्जातील मागणीनुसार दि. ३१.३.२०११ पर्यंत किंवा त्यापूर्वी वीज जोडणी द्यावी व त्या आदेशाची पूर्तता केल्याचे मंचास त्वरित कळविण्यात यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.